LND 2 2752003

नविन शर्तीच्या जमिनींच्या विक्रीच्या परवानगी संदर्भातील प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी विभागीय आयुक्त यांना सूचना देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२००३/प्र.क्र.१०४/ल-६,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,दि.२९.९.२००३

## परिपत्रक

नविन शर्तीच्या जमिनींच्या विक्रीच्या प्रस्तावांना मंजूरी देण्यास होणारा विलंब आणि त्यामुळे शेतक-यांना होणारा त्रास लक्षात घेवून परवानगी देण्यासंदर्भातील अधिकार आयुक्तांना देण्यात यावेत असे लोकप्रतिनिधीनी शासनाकडे आग्रह धरुन सागितले होते, त्यानुसार सदर अधिकार शासनाने आपणाकडे दिलेले आहेत. परंतु शासनापेक्षाही आयुक्तांच्या कार्यालयाकडून अधिक विलंब होतो. त्यामुळै गरीब, कष्टकरी, आदिवासी, बिगर आदिवासी शेतकरी यांना आपल्या कुटूंबातील व्यक्तींचे आजारपण, लग्नसमारंभ व अन्य आर्थिक अडचणीसाठी शेवटी त्यांना इतर दामदुप्पट व्याजाने कर्ज घेवून वेळ निभवावी लागते. असे मा.ना.श्री.सुरुपसिंग नाईक, मंत्री (वने व पर्यावरण) यांनी त्यांच्या दि.४.४.२००३ च्या पत्रान्वये मा.मंत्री (महसूल) यांच्या निदर्शनास आणून दिले आहे. पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

वरील परिस्थिती विचारात घेवून शासन असे आदेश देत आहे की, यापुढे तहसिलर कार्यालयाकडून नवीन शर्तीच्या जमीन विक्रीचे प्रस्ताव त्याच्या वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करतांना त्यामध्ये मूळ जुन्या नोंदीची माहिती समाविष्ठ करुन सर्व समावेशक व स्वयंस्पष्ट प्रस्ताव पाठवावा. तसेच आयुक्त कार्यालयाने नवीन शर्तीच्या जमिन विक्रीचे प्रस्ताव तपासतांना उद्भवणाच्या त्रुटी मध्ये कायदा, नियम व शासन निर्णय यांच्याशी संबंधित असलले मुद्दे व त्रुटी एकाच वेळी जिल्हाधिकारी व त्यांचे अधिनस्त कार्यालयांना कळविण्यात याव्यात व अशा सर्व प्रलंबित प्रकरणांचा निपटारा त्वरीत करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार नव्यांने,

सही/-
(य.दा.कांबळे,)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग,

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त

*********

क्र.मशा/कार्या-२/जमिन(२)/कावि-२९४५
आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय
कोकण भवन,१ला मजला,नवी मुंबई
दिनांक:- ०२/१२/२००३

प्रति,
जिल्हाधिकारी, मुंबई शहर/मुंबई उपनगर /ठाणे/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग व अपर जिल्हाधिकारी, जव्हार यांचेकडे माहिती व शासनाने दिलेल्या निदेशाप्रमाणे अंमल बजावणीसाठी अग्रेषित.

आयुक्त कोकण विभाग करिता

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी.
INC 6 डिसेंबर 2003
शाखा
अ. लि. नि. उ. जि. जिल्हाधिकारी

| | |
|---|---|
| आवक नंबर | ५०६७५-०३ |
| विभाग नोंदवही नंबर | |
| कार्य विवरण नंबर | |

मंत्री
वने व पर्यावरण
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४००

दिनांक ०४.४.२००३

मंत्री/महसूल/अतिमहत्वाचे १९३

नविन शर्तीच्या जमिनीच्या विक्रीच्या परवानगी संदर्भात विविध प्रकरणे आयुक्त कार्यालयाकडे परवानगीसाठी पाठविण्यात येतात. त्याबाबतीत होणाऱ्या कार्यवाहीसंदर्भात काही बाबी आपल्या निदर्शनास आणून देवू इच्छितो.

साधारणतः गरीब, कष्टकरी, आदिवासी, बिगर आदिवासी शेतकरी आपल्या जमिनीची विक्री त्यांच्या कुटुंबातील आजारपण, लग्नसमारंभ व अन्य आर्थिक अडचणी इ. कारणांमुळे करीत असतात.

कुटुंबातील एखाद्या व्यक्तीच्या आजारपणासाठी शेतकऱ्याला त्वरित पैशाची आवश्यकता असते. त्यासाठी शेतकरी जमिनी विक्रीस काढतात. परवानगीसाठी आपल्या कार्यालयाकडे प्रकरण पाठवतात. जिल्हाधिकारी / आयुक्त कार्यालयाकडून त्या प्रकरणात असलेल्या त्रूटींबाबतची माहिती यथावकाशपणे कळविली जाते. त्यानुसार तृटींची पूर्तता करुन सदरहू कार्यालयाकडे शेतकरी पुन्हा प्रकरण पाठवतो. सदरहू कार्यालयाकडून त्याच प्रकरणात पुन्हा दुसऱ्या तृटी काढून पाठविल्या जातात व प्रत्येक वेळी नविन मुद्दा उपस्थित करुन प्रकरण दोन-तीन वेळा परत पाठविण्यात येते. विशेषतः मूळ नोंदीची माहिती कार्यालयाकडून मागविली जाते. शंभर ते सव्वाशे वर्षापूर्वीच्या मूळ नोंदी आढळत नाहीत. शासनाच्या अधिकाऱ्याकडे मूळ नोंदी उपलब्ध होत नाहीत. तर शेतकऱ्याकडे त्या नोंदी मिळणे अशक्यप्राय असते. तसेच मूळ नोंदणी नंतर ५ ते १० वेळा नोंदी बदललेल्या जातात. त्यावेळी मूळ नोंदणीची दखल घेतलेली आहे किंवा नाही याची शहानिशा केली जात नाही. मात्र जमीन विक्रेत्या शेतकऱ्यांने अर्ज केल्याबरोबर मूळ नोंदणीची मागणी होते. त्यामुळे सदर प्रकरण मार्गी लागून परवानगी मिळाण्यास बराच विलंब होत असल्यामुळे शेतकरी हैराण

मंत्री
वने व पर्यावरण
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक :

होतात. मूळ नोंदी शेतकऱ्यांजवळ नसतात त्या जुन्या नोंदी तहसील कार्यालयाच्या रेकॉर्ड रुमला उपलब्ध असतात त्यामुळे अशा नोंदी तहसील कार्यालयाने त्या रेकॉर्ड मधून उपलब्ध करुन घ्याव्यात व त्या नोंदी प्रकरणात सामील कराव्यात असे आपण शासन स्तरावरुन आदेश देणे गरजेचे आहे.

कुटुंबातील व्यक्तीचे आजारपण, लग्नसमारंभ इत्यादिसाठी शेवटी त्याला इतर दामदुप्पट व्याजाने व्यवहार करुन वेळ निभवावी लागते.

यापूर्वी या प्रकरणी होणारा विलंब आणि वेळ काढूपणाचे धोरण लक्षात घेऊन परवानगी देण्यासंदर्भातील अधिकार लोकप्रतिनिधींनी शासनाकडे (विभागाच्या सचिवांकडे) आग्रह धरुन आयुक्तांना द्यावयास सांगितले होते व त्यानुसारच अधिकार आयुक्तांना देण्यात आले. परंतु शासनापेक्षाही आयुक्तांच्या कार्यालयाकडून अधिक विलंब होतो अशी वस्तुस्थिती आहे. कायदा नियम व शासन निर्णय यांचे पालन होणे आवश्यक आहे या मताशी मी पूर्णपणे संबंधित आहे. मात्र सदर प्रकरणातील त्रुटींमध्ये कायदा, नियम व शासन निर्णय यांच्याशी संबंधित असलेले मुद्दे व प्रकरणांतील तृटी एकाचवेळी आयुक्त कार्यालयाने जिल्हाधिकारी व त्यांचे अधिनस्त कार्यालयांना कळविणे आवश्यक आहे असे माझे मत आहे.

तरी आपण याबाबत सर्व आयुक्त, जिल्हाधिकारी यांना आपल्या स्तरावरुन प्रकरणांचा निपटारा त्वरित लावण्याबाबत संबंधितांना आदेश द्यावेत, अशी विनंती आहे.

(सुरुपसिंग नाईक)

मा. मंत्री (महसूल)

D:\Jaidas\Land -Revenue Dept. ४.४.०३.doc